प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २२.०१.२०२१**

**जेएनपीटीच्या साडे बारा टक्के योजनेच्या अंमलबजावणीसाठी**
**जेएनपीटी आणि सिडको यांमध्ये सामंजस्य करार**

जेएनपीटी (जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट) प्रकल्पबाधितांसाठी साडे बारा टक्के (**१२.५%**) योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनातर्फे सिडकोला प्राधिकृत करण्याकरिता जेएनपीटी आणि सिडको यांदरम्यान **मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक **१८ जानेवारी २०२१** रोजी सामंजस्य करार (मेमोरँडम ऑफ अंडरस्टॅन्डिंग) करण्यात आला. **सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी व जेएनपीटीचे अध्यक्ष श्री. संजय सेठी** यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

**"या सामंजस्य कराराच्या माध्यमातून ११,००० प्रकल्पबाधितांना लाभ मिळणार आहे. सिडकोतर्फे १२.५% योजनेंतर्गत सदर भूखंड विकसित करण्यात येणार असून सिडको हे काम चोखपणे करेल" असा विश्वास मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांनी या कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केला.**

**"शासनाने सिडकोच्या क्षमतांवर विश्वास ठेऊन ही महत्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. सिडको ही जबाबदारी निश्चितच उत्तमरित्या पार पाडेल याची मला खात्री आहे असे उद्गार या प्रसंगी डॉ. संजय मुखर्जी यांनी काढले."**

नवी मुंबई क्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात जेएनपीटी बंदर विकसित करण्यात येऊन १९८९ मध्ये या प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. जेएनपीटी प्रकल्पबाधितांनाही संपादित जमिनीच्या मोबदल्यात, नवी मुंबई प्रकल्पबाधितांप्रमाणे साडे बारा टक्के योजने अंतर्गत विकसित भूखंड देण्याचा निर्णय जेएनपीटीकडून घेण्यात आला. याकरिता जेएनपीटीने १११ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य शासनाला हस्तांतरीत केली. तर राज्य शासनाने आपल्या वतीने सिडकोने जेएनपीटीसाठी साडे बारा टक्के योजनेची अंमलबजावणी करावी, यासाठी सिडकोला प्राधिकृत केले आहे. सिडकोचा साडे बारा टक्के योजनेच्या अंमलबजावणीचा दीर्घ अनुभव लक्षात घेऊन या योजनेच्या प्रभावी व जलद अंमलबजवाणीसाठी सिडकोला प्राधिकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या सामंजस्य करारानुसार जेएनपीटीकडून साडे बारा टक्क्यांचे भूखंड विकसित करण्यासाठी सिडकोला १११ हेक्टर भाररहित जमिनीचे हस्तांतरण करण्यात येणार आहे. या क्षेत्रासाठी सिडको विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम पाहणार असून योजनेचा आराखडाही सिडको तयार करणार आहे. भूखंड विकसित करण्याकरिता जेएनपीटीकडून सिडकोला विकासापोटी येणारा खर्च तसेच प्रत्यक्ष खर्चाच्या ५% पर्यवेक्षण शुल्क देण्यात येणार आहे. नवी मुंबई भूमी विनियोग अधिनियम २००८ नुसार लाभार्थ्यांना भूखंडाचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच भूखंडांचे वाटप करण्याकरिता सिडकोकडून अत्यंत पारदर्शक अशा संगणकीय सोडतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**